सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) च्या आस्थापने-वरील “अवर सचिव (विधि)” संवर्गातील १ पद “उपसचिव (विधि)” या संवर्गात श्रेणीवर्धित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः आढावा-१८१८/प्र.क्र.९/१९अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख : २१ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा :</u>

(१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-पदनि-१०१२/१/२०१२/१९अ, दिनांक २९ डिसेंबर २०१२

(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-अपमु-२९१७/प्र.क्र.४४/१९अ, दिनांक १० जानेवारी २०१८

(३) शासन आदेश, विधि व न्याय विभाग क्रमांक-इएसटी-२०१७/प्र.क्र.१४२/का-२, दिनांक ९ जानेवारी २०१८

<u>प्रस्तावना :</u>

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक-१, दिनांक २९ डिसेंबर २०१२ च्या शासन निर्णयान्वये विधिविषयक सल्ला, न्यायालयीन याचिकेसाठी शपथपत्र दाखल करणे इत्यादी बाबींसाठी मुख्य सचिव कार्यालय व सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) करिता वेतन बँड रु.१५,६००-३९,१०० + ग्रेड पे रु.६,६०० या वेतनश्रेणीतील प्रत्येकी १ प्रमाणे अवर सचिव (विधि) संवर्गातील दोन अस्थायी पदे सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात आली आहेत. या अस्थायी पदांना संदर्भाधीन क्रमांक-२, दिनांक १० जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. मुख्य सचिव कार्यालयातील अवर सचिव (विधि) पदावर कार्यरत असलेल्या श्रीमती सीमा कृष्णदास परमार यांना विधि व न्याय विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक-३, दिनांक ९ जानेवारी २०१८ च्या शासन आदेशान्वये वेतन बँड रु.१५,६००-३९,१०० + ग्रेड पे रु.७,६०० या वेतनश्रेणीतील उपसचिव (विधि) पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येऊन, त्यांची पदस्थापना सध्या कार्यरत असलेल्या विभागातील मुख्य सचिव कार्यालयात करण्यात आली आहे.

३. सामान्य प्रशासन विभागासाठी उपसचिव (विधि) असे पद मंजूर नसल्यामुळे, श्रीमती परमार यांना पदोन्नतीच्या पदावर रुजू करुन घेणे शक्य नाही. यामुळे त्यांच्याकरिता या विभागातील अवर सचिव (विधि) संवर्गातील १ पद त्या मुख्य सचिव कार्यालयात कार्यरत असेपर्यंत उपसचिव (विधि) या संवर्गात श्रेणीवर्धित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील मुख्य सचिव कार्यालयातील अवर सचिव (विधि) संवर्गातील पीबी-३, रु.१५,६००-३९,१०० + ग्रेड वेतन रु.६,६०० या वेतनश्रेणीचे १ पद उपसचिव (विधि) संवर्गातील पीबी-३, रु.१५,६००-३९,१०० + ग्रेड वेतन रु.७,६०० या वेतनश्रेणीत दिनांक ९ जानेवारी २०१८ पासून श्रेणीवर्धित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर पद सामान्य प्रशासन विभागातील कार्यासन-१ (मुख्य सचिव कार्यालय) मध्ये कार्यरत राहिल.

२. या श्रेणीवर्धित पदावर श्रीमती सीमा कृष्णदास परमार, अवर सचिव (विधि) यांना दिनांक ९ जानेवारी २०१८ (म.पू.) पासून पदोन्नतीने रुजू करुन घेण्यात येत आहे. हे श्रेणीवर्धित पद, त्या मुख्य सचिव कार्यालयातील उपसचिव (विधि) पदावर कार्यरत असेपर्यंत राहिल. त्यानंतर हे पद आपोआप अवर सचिव (विधि) पदावर रुपांतरित म्हणजेच श्रेणी अवनत होईल.

३. याबाबत होणारा खर्च सामान्य प्रशासन विभागाच्या योग्य त्या अर्थसंकल्पिय लेखाशीर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-५६/सेवा-९, दिनांक १२ फेब्रुवारी २०१८ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२११२३१४२८८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gholap Pramod tanaji

Digitally signed by Gholap Pramod tanaji
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2679f8cefb6b05674a35ce5f6a835e45918fb84c8358b0c66e5c6c026a482d44, cn=Gholap Pramod tanaji
Date: 2018.02.21 12:32:52 +05'30'

(प्रमोद घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. सहसचिव (प्रशासन), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सहसचिव (कार्यासन-१), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
९. श्रीमती सीमा कृष्णदास परमार, उपसचिव (विधि), मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.

१०. अवर सचिव (२६-रोख शाखा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. कक्ष अधिकारी (कार्यासन : सेवा-९), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. कक्ष अधिकारी (आकृतीबंध पुनर्रचना कक्ष), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. कक्ष अधिकारी (कार्यासन-१९ आस्थापना), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. वैयक्तिक नस्ती / कार्यासन-१९.
१५. निवड नस्ती / कार्यासन-१९अ.